# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/03/2023 (मंगळवार) दुपार


### विनयभंग

पो.स्टे. सावनेर:— दि. १८/०१/२०२३ चे १४.३० ते दि. ०६/०३/२०२३ चे १५.२० वा. दरम्यान यातील फिर्यादी/पिडीता वय १७ वर्ष ही अल्पवयीन असल्याचे माहीत असतांना सुध्दा यातील आरोपी नामे— नितीन महेन्द्र गणवीर वय २१ वर्ष रा. प्रतापनगर नागपुर याने नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी/पिडीतेचा पाठलाग करून फिर्यादीचे घराचे आत येवुन तिला आवाज देवुन फिर्यादी/पिडीतेची छेडखानी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४(ड) भादवि सहकलम १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास श्री. मारूती मुळूक पोलीस निरीक्षक हे करीत आहे.

### घरफोडी

पो.स्टे. बुट्टीबोरी :— अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील मौजा रूईखैरी सब स्टेशन ता. जि. नागपुर येथे दिनांक ०६/०३/२०२३ चे पहाटे ०३.०० वा. ते ०९.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— प्रफुल ओंकारलाल शिंगाडे, वय ४५ वर्ष रा. २८ पाटील ले आउट स्वावलंबी नगर शेवटचे बस स्टाफ नागपुर हे दि. ०६/०३/२०२३ रोजी सकाळी ०९. ०० वा. ऑफीसला जाण्याकरीता तयारी करीत असता लाईनमॅन सुर्यवंशी याचा फोन आला व त्याने सांगितले की रूईखैरी सब स्टेशन ऑफीसचे कुलुप तुटलेले आहे अशा माहीती वरून तिथे फिर्यादीने जावुन पाहीले असता १) जप्त असलेले पाण्याची मोटार ०१ नग किंमती अंदाजे ४०००/—रू. ०२) विदयुत वायर २.५ चौमिमी चे ०२ बंडल अंदाजे १८० मीटर किंमती अंदाजे १८००/— रू ०३) जप्त असलेले वायर २०० फुट किंमती अंदाजे ५००/— रू ०४) ॲल्युमिनीयम तार ३०० फुट किंमती अंदाजे ३०००/— रू ०५) ए. बी स्विच पॉईंट ०४ सट किंमती अंदाजे १०००/— रू ०६) ०३ नग कुलुप किंमती अंदाजे ५००/— रू असा एकुण १०,८००/—रूपयाचा मुद्देमाल कोणत्यातरी अज्ञात इसमाने ऑफीसचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून स्टोअर रूम मध्ये ठेवलेले वरील प्रमाणे चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक तिलकचंद रामटेके ब. नं ६९२ मो. नं. ९५२२८०३९०० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर